विदर्भ व मराठवाडा विभागातील उद्योगांना पुरविल्या जाणाऱ्या वीजेच्या दराचे सुसूत्रीकरण करण्यासाठी व तद्नुषंगिक बाबींवर अभ्यास करण्यासाठी गठीत केलेल्या समितीने सादर केलेल्या अहवालाबाबत..

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ५ जानेवारी, २०१६.

<u>वाचा</u> :- उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.२३८/ऊर्जा-५, दिनांक २९ सप्टेंबर,२०१५

<u>प्रस्तावना :-</u>

विदर्भ व मराठवाडा विभागातील उद्योगांना पुरविल्या जाणाऱ्या वीजेच्या दराचे सुसूत्रीकरण करण्यासाठी व तद्नुषंगाने इतर बाबींवर अभ्यास करण्यासाठी विभागीय आयुक्त, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली आंतरविभागीय समिती उपरोक्त दि.२९ सप्टेंबर, २०१५ च्या शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आली होती. सदर समितीने विदर्भ व मराठवाडा विभागातील संबंधित औद्योगिक संघटना, फेडरेशन, खाजगी व सार्वजनिक उद्योग यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करुन, सर्व स्रोतांद्वारे आवश्यक ती माहिती प्राप्त करुन, त्याचा अभ्यास करुन शासनास अहवाल सादर केला आहे. सदर समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी करण्यापूर्वी अन्य संबंधित विभागांशी विचारविनिमय करणे आवश्यक आहे. त्याकरिता सदर समितीचा अहवाल तसेच अहवालातील शिफारशींचा अभ्यास करण्यासाठी सचिव स्तरावरील समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :-

शासन निर्णय :-

सदर निर्णयाच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे :-

१)	मुख्य सचिव	-	अध्यक्ष
२)	अपर मुख्य सचिव (वित्त)	-	सदस्य
३)	अपर मुख्य सचिव (नियोजन)	-	सदस्य
४)	प्रधान सचिव (उद्योग)	-	सदस्य
५)	प्रधान सचिव (वस्त्रोद्योग)	-	सदस्य
६)	प्रधान सचिव (सहकार)	-	सदस्य
७)	प्रधान सचिव (ऊर्जा)	-	सदस्य-सचिव

२. उपरोक्त समितीने, विभागीय आयुक्त,नागपूर यांच्या अध्यक्षतेखालील आंतरविभागीय समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींची छाननी करुन उपयुक्त मुख्य बाबी २० दिवसात निश्चित कराव्यात.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१०५१५५९४७०४१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Bhimashankar Yallapa Manta

Digitally signed by Bhimashankar Yallapa Manta
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400051, st=Maharashtra, cn=Bhimashankar Yallapa Manta
Date: 2016.01.05 16:01:12 +05'30'

(भि. य. मंता)
शासनाचे उपसचिव

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. मंत्री(ऊर्जा) यांचे खाजगी सचिव
४) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधानपरिषद,विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई.
५) मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव (नियोजन) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८) प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
९) प्रधान सचिव (वस्त्रोद्योग), सहकार व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
१०) प्रधान सचिव (सहकार) ,सहकार व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई
११) प्रधान सचिव (ऊर्जा),उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
१३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई/ महाराष्ट्र-२, नागपूर
१४) महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
१५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१६) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१७) अवर सचिव (रोखशाखा), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) अवर सचिव (ऊर्जा-३), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) कक्ष अधिकारी, (अर्थसंकल्प/व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२०) निवड नस्ती (ऊर्जा-५), उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१) ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.